# जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय

प्रशासकीय इमारत, १० वा मजला, सरकारी वसाहत, बांद्रा (पू.) मुंबई-५१
Ph.6556799, 6550111 Fax : 6556805 email address:- collrmsd@yahoo.com

क्र. :- सी/कार्या-३डी/कावि-८९/२००३
दिनांक :- ६/१२/२००३

प्रति,
सहाय्यक व्यवस्थापक (इस्टेट)
मे. टाटा पावर कंपनी लि.,
इस्टेट डिपार्टमेंट, जी.आय.एम. बिल्डींग,
धारावी रिसिव्हींग स्टेशन, माटुंगा,
मुंबई-४०० ०१९.

विषय :- जमीन : मुंबई उपनगर जिल्हा
मौजे मालाड ता. बोरीवली येथील
११० के.व्ही. ट्रान्समिशन पॉवर लाईन
शासनाचे मालकीच्या स.नं.५०४ प
नाला जमिनीवर (अंदाजे क्षेत्र १२५ चौ.मी.)
स्थलांतर करण्यास परवानगी देणेबाबत

संदर्भ : १) आपले कडील पत्र क्र.जीएम/(सीई) आयडब्ल्यू/
२५१-५१४/१२ दि.१/२/२००३
२) सम क्रमांकाचे दि.१८/२/२००३ चे पत्र
३) पत्र क्र.जीएम(सीई)/ईएनडी-२५१/३२६ दि.१७.३.०३
४) पत्र क्र.बीपी/३०० ओ/५२३ दि.७/३/२००३
५) पत्र क्र.बीपी/३०० ओ/५८९ दि.२०/३/२००३
६) पत्र क्र.बीपी/३००ओ/६७६ दि.१९/६/२००३
७) सहाय्यक अभियंता (विकास आराखडा) पी.
विभाग यांचेकडील पत्र क्र.सीएचई/३४६/डीपीडब्ल्यूएस
दि.१८.६.२००३
८) मे. टाटा पॉवर कंपनीकडील पत्र क्र.बीपी/३००ओ/१३२२
दि.२४.११.२००३

महोदय,

मे. टाटा पावर कंपनी यांची मालाड-वर्सोवा ट्रान्समिशन पॉवर लाईन अस्तित्वात आहे. ती ट्रान्समिशन पावर लाईन स्थलांतर करण्याबाबत कंपनीने या कार्यालयाकडे स्थलांतरासाठी परवानगी मिळणे



Scanned by CamScanner

बाबत संदर्भीय पत्रान्वये विनती केलेली आहे. या प्रकरणी नगर भूमापन अधिकारी व तहसिलदार बोरीवली यांचेकडून अनुक्रमे दिनांक ८/८/२००३ व २०/८/२००३ रोजी अहवाल प्राप्त केले आहेत. त्यांचे अहवालाप्रमाणे कंपनीस मौजे-मालवणी, दारवली व मालाड या गांवच्या बाहेरील व नजदीक असलेल्या नाल्यापैकीची जमीन सुमारे १००.०० ते १२५.०० चौ.मी. क्षेत्र टॉवर उभारण्यासाठी लागेल. सदरची जमीन नाला व मौजे मालाड न.भू.क्र.५०४ पै ची आहे. कंपनीस फक्त टावर बी व सी हे (नकाशात दार्शविलेले) हे दोनच टावर स्थलांतर करणेचे आहेत. प्रत्येक टावर ४.२ X ४.२ चौ.मीटर प्रमाणे एकूण ३५.२८ चौ.मी. अंदाजे जमीन लागणार आहे. तसेच पावर लाईन खालील जमीन विचारात घेता १००.०० ते १२५.०० चौ.मीटर जमीन बाधीत होणार आहे.

कंपनीने टावरसाठी मागणी केलेली जमीन नाल्यापैकी, खाडीपैकी तसेच ना विकास पट्टयामध्ये पडत आहे. कंपनीने पावर लाईन स्थलांतरीत जमिनीचे भाडे तथा भाडेपट्टा भरण्यास तयार असल्याबाबत मुद्रांक पेपरवर हमीपत्र दिले आहे. स्थलांतर करण्यास परवानगी देण्याबाबत शासन, महसूल व वन विभागाकडे इकडील सम क्रमांकाचे पत्र दि.३०/१०/२००३ ने अहवाल सादर करण्यात आलेला आहे.

वरील परिस्थिति विचारात घेता टॉवर व ट्रान्समिशनपावर लाईन स्थलांतर करण्यास खालील अटी व शर्तीवर शासनाचे अंतीम आदेशास अधिन राहून फक्त पावसाळयापूर्वी काम होणेसाठी काम चालु करणेस ना हरकत प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

१) टावर स्थलांतर करण्यास परवानगी दिलेल्या जमिनी संबंधी भाडेपट्टा/नुकसान भरपाई तथा कब्जाहक्काची रक्कम शासन ठरविल त्या दराने ताबा दिल्यापासून व्याजासह आदा करावी लागेल.

२) टावर व पावर लाईन खालील जमिनीची मालकी शासनाची राहील या जमिनीचे क्षेत्र नगर भूमापन अधिकारी यांचेकडून निश्चित करण्यात येईल व ते कंपनीस मान्य असेल.

३) टावर व पावर लाईन खालील जमिनीची शासनास गरज लागल्यास सदरची जागा खाली करुन ताबा दयावा लागेल त्यासाठी कोणतीही नुकसान भरपाई मिळणार नाही.

४) टावर व पावर लाईन खालील जमिनीचा विकास हक्क (टीडीआर) वापरता येणार नाही.

५) या जमिनीमध्ये विनापरवाना खोदकाम करता येणार नाही तसेच इतर कोणतेही बांधकाम करता येणार नाही.

Scanned by CamScanner

६) स्थलांतरासाठी लागणाऱ्या जमिनीचा ताबा नगर भूमापन अधिकारी मालाड व मंडळ अधिकारी मालाड यांचेकडून घ्यावा व ताबा पावतींची दुहेरी प्रत सादर करावी.

७) सदरची परवानगी शासनाचे पुढील अंतिम आदेशास अधीन राहून देण्यात येत आहे. वरील अटी व्यतिरिक्त शासनाकडून अतिरिक्त अटी घातल्यास त्या कंपनीस बंधन कारक राहतील.

८) वरील अटी/शर्ती मान्य असल्या बाबतचे हमीपत्र रक्कम रु.१००/- चे स्टॅम्प पेपरवर सात दिवसांचे आत सादर करावे.

स्थळप्रतीवर जिल्हाधिकारी यांची सही आहे

जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हाकरीता

प्रत : नगर भूमापन अधिकारी, मालाड/तहसिलदार बोरीवली यांचेकडे माहीतीसाठी रवाना

२/- त्यांनी जमिनीचा ताबा मे. टाटा पावर कं.लि. यांचे प्रतिनिधीस द्यावा व ताबा पावती (दुहेरी) सह अहवाल सादर करावा

जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हाकरीता

स्थळप्रतीवर जिल्हाधिकारी यांची सही आहे

Received 6/12/03

6/12/03
S.K.

Scanned by CamScanner

# जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय

प्रशासकीय इमारत, १० वा मजला, सरकारी वसाहत, बांद्रा (पू ) मुंबई-५१

दूरध्वनी : ६५५६७९९, फॅक्स : ६५५६८०५ E mail – collrmsd@yahoo.com

क्रमांक : सी/ कार्या - ३ डी /एल-६२४
दिनांक : /१/२००८
25 JAN 2008

प्रति,
सहाय्यक व्यवस्थापक ( इस्टेट)
मे. टाटा पॉवर कंपनी लिमिटेड,
इस्टेट डिपार्टमेंट जी वाय एस
बिल्डींग, धारावी रिसिव्हींग स्टेशन
माटूंगा, मुंबई ४०० ०१९.

**विषय : जमिन : मुंबई उपनगर जिल्हा**
मोजे मालाड, ता. बोरीवली येथील ११० के. व्ही. ट्रान्समिशन पॉवर लाईन स्थलांतरीत करण्यासाठी १०० ते १२५ चौ. मी. खाडी पैकी जमीन टॉवर बांधणेसाठी मंजूर करणेबाबत.

**संदर्भ :-** या कार्यालयाचे पत्र सम क्रमांक दि. ६/१२/२००३, ४/७/२००५ व १८/८/२००५ दि. २९/५/२००५.

प्रस्तुतच्या प्रकरणी या कार्यालयाचे दि. ४/७/२००५ व दि. १८/८/२००५ अन्वये काही मुद्दयांबाबत खुलासा करण्याबाबत व कागदपत्रे सादर करण्याताबाबत कळविण्यात आले होते परंतु अद्याप पर्यंत आपला खुलासा या कार्यालयास प्राप्त झालेला नाही. वरील संदर्भात आपणांस पुन्हा कळविण्यात येते की, आपला खुलासा ७ दिवसात या कार्यालयास सादर करावा अन्यथा आपला अर्ज कोणतेही कारण न देता निकाली काढणेत येईल याची कृपया नोंद घ्यावी.

स्थळप्रतीवर मा. जिल्हाधिकारी यांची सही आहे.

जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हाकरीता

Issued
25/01/08



Scanned by CamScanner